RNI No. MAHBIL/2009/31743
Reg. No. MCS/169/2016-18

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार–ब

वर्ष ३, अंक ५१] **गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २१-२७, २०१७/अग्रहायण ३०-पौष ६, शके १९३९** **[पृष्ठे १४, किंमत : रुपये २०.००**

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ डिसेंबर २०१७

अधिसूचना

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.

क्रमांक मविन्या १२१७/प्र.क्र. ९१/विक्रीकर प्रशासन-१.—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (सन २००५ चा महा. ९) च्या कलम-११ मधील उप-कलम (१) आणि (३) तसेच महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ च्या नियम ६ अन्वये आणि इतर प्रदान केलेल्या सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे श्री. प्रल्हाद चिंधू बावस्कर, सेवानिवृत्त प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, धुळे, यांची महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणावर न्यायिक सदस्य म्हणून त्यांनी सदर पदाचा कार्यभार ग्रहण केल्याच्या तारखेपासून दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज. अ. शेख,
शासनाचे उप सचिव.

FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th December 2017

NOTIFICATION

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. MVN-1217/C.R.91/Sales Tax (ADM-1).—In exercise of the powers conferrd by sub-sections (*1*) and (*3*) of section 11 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005) read with rule 6 of the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, appoints Shri Pralhad Chindhu Bavaskar, Retired Principal District and Sessions Judge, Dhule as the Judicial Member of the Maharashtra Sales Tax Tribunal with effect from the date on which he assumes the charge of the said post, till the 30th September 2019.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Z. A. SHAIKH,
Deputy Secretary to Government.

प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई

नगर भवन, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक १२ डिसेंबर २०१७

आदेश

क्रमांक सीएसडी/२४७/२०१७.—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (सन १९५८ चा महा. मुद्रांक अधिनियम क्र. ६०) च्या कलम ९(ब) अन्वये व महाराष्ट्र शासनाचे दिनांक २९ जून २०१६ रोजीच्या आदेशानुसार अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व लोकहितार्थ तसे करणे आवश्यक आहे अशी अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांची खात्री झाल्यानंतर अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई मे. VAG BUILDTECH LIMITED यांना या संस्थेच्या एकूण ११,२७,५००० शेअर प्रमाणपत्राद्वारे (Bonus Equity Shares) वितरीत व्हावयाच्या प्रत्येकी रु. १० दर्शनी किंमतीच्या + NIL अधिमुल्यासह = एकूण रु. ११,२७,५०,००० च्या क्रमांक ५६३७५०१ ते १६९१२५०० पर्यंतच्या एकूण (दोन्ही धरून) शेअर्सवर (Bonus Equity Shares) रु. १,१२,७५० (रुपये One Lakh Twelve Thousand Seven Hundred Fifty Rupees Only) एवढे भरणा केलेल्या एकत्रित मुद्रांक शुल्कास या आदेशाद्वारे मान्यता देत आहे. या शेअर्समध्ये स्थावर मालमत्तेचा समावेश नाही.

मुंबई,
दिनांक १२ डिसेंबर २०१७.

सुरेश जाधव,
अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.

पुढील अधिसूचना, इत्यादी असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिद्ध झाल्या आहेत :—

२५५

गुरुवार, ऑक्टोबर २९, २०१५/कार्तिक ७, शके १९३७

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑक्टोबर २०१५.

अधिसूचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५.

क्रमांक संकीर्ण. १०१४/१३०६/प्र.क्र.१७६/नापु-१२.—महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ च्या महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाद्वारे दिनांक २१ जुलै २०१५ रोजी निर्गमित केलेली अधिसूचना याद्वारे रद्द करण्यात येत असून, उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी याबाबतच्या सुधारित बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे नव्याने सेवा अधिसूचित करीत आहे :—

परिशिष्ट

अ. क्र.	लोकसेवेचा तपशील	लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा	पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपील अधिकारी	द्वितीय अपील प्राधिकारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	नवीन शिधापत्रिका मागणी	३० दिवस	शिधावाटप अधिकारी/ परिमंडळ अधिकारी/ तहसिलदार/अन्नधान्य वितरण अधिकारी.	सहायक नियंत्रक शिधावाटप/अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी	उप नियंत्रक शिधावाटप/ उप आयुक्त (पुरवठा).

परिशिष्ट–चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२	१. शिधापत्रिकेतील नावात दुरुस्ती.	०३ कार्यालयीन दिवस.	शिधावाटप अधिकारी/ परिमंडळ अधिकारी/ तहसीलदार/अन्नधान्य वितरण अधिकारी.	सहायक नियंत्रक शिधावाटप/अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी.	उप नियंत्रक शिधावाटप/ उप आयुक्त (पुरवठा).
	२. शिधापत्रिकेत नावे समाविष्ट करणे/नाव वाढविणे.	गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०३ कार्यालयीन दिवस.			
	३. शिधापत्रिकेमधील नाव कमी करणे.	०३ कार्यालयीन दिवस.			
	४. शिधापत्रिकेवरील पत्ता बदल करणे.	३० दिवस			
३.	१. दुय्यम शिधापत्रिका (खराब/ फाटलेली इत्यादी)	गृहभेट आवश्यक असल्यास ३० दिवस अन्यथा ०६ दिवस.	शिधावाटप अधिकारी/ परिमंडळ अधिकारी/ तहसीलदार अन्नधान्य वितरण अधिकारी.	सहायक नियंत्रक शिधावाटप/अन्नधान्य वितरण अधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी.	उप नियंत्रक शिधावाटप/ उप आयुक्त (पुरवठा).
	२. दुय्यम शिधापत्रिका (गहाळ शिधापत्रिका).	३० दिवस			
४	नवीन रास्तभाव दुकानाची मंजुरी	जाहिरनामा काढल्यानंतर १८० दिवस.	नियंत्रक शिधावाटप/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी.	विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी.	सचिव/विभागीय आयुक्त.
५	रास्तभाव दुकानाच्या परवान्याचे नुतनीकरण.	६० दिवस	उप नियंत्रक शिधावाटप/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी.	नियंत्रक शिधावाटप/ जिल्हाधिकारी.	विभागीय आयुक्त
६	किरकोळ रॉकेल विक्री परवाने	९० दिवस	अन्नधान्य वितरण अधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी.	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त
७	किरकोळ रॉकेल विक्री परवान्याचे नुतनीकरण.	६० दिवस	अन्नधान्य वितरण अधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी.	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

दीपक कपूर,
शासनाचे सचिव.

FOOD, CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 14th October, 2015.

NOTIFICATION

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ORDINANCE, 2015.

No.Mis.1014/1306/C.R.176/CS-12:—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 3 of the Maharashtra Right to Public Services Ordinance, 2015 (Mah. Ord. No.V of 2015), the notification issued on 21st July, 2015 by Food, Civil Supply and Consumer Protection Department is cancelled. For the purpose of above ordinance, Food, Civil Supply and Consumer Protection Department hereby notifies the public services to be rendered to the eligible persons by its sub-ordinate officers, with the stipulated time limit along with the designated officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the following revised Schedule:—

Schedule

Sr. No.	Public Service	Time limit for providing service (Working Days)	Designated Officer	First Appellate Officer	Second Appellate Officer
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)
1	Issuance of new Ration Card.	30 Days	Rationing Officer / Zonal Officer / Tahsildar / Food Distribution Officer.	Assistant Controller of Rationing / Food Distribution Officer / District Supply Officer.	Deputy Controller of Rationing / Deputy Commissioner (supply)
2	1. Correction of name in Ration Card.	03 Working Days.	Rationing Officer / Zonal Officer / Tahsildar / Food Distribution Officer.	Assistant Controller of Rationing / Food Distribution Officer / District Supply Officer.	Deputy Controller of Rationing / Deputy Commissioner (supply)
	2. Inclusion of names in Ration Card	30 Days if home visit is required otherwise 03 Working Days			
	3. Removal of name in Ration Card	03 Working Days			
	4. Change of address in Ration Card	30 Days			
3	1. Duplicate copy of Ration Card (in case of defective/ torn Ration Card)	30 Days if home visit is required otherwise 06 Days	Rationing Officer/ Zonal Officer/ Tahsildar/Food Distribution Officer	Assistant Controller of Rationing / Food Distribution Officer / District Supply Officer.	Deputy Controller of Rationing / Deputy Commissioner (supply)
	2. Duplicate copy of Ration Card (in case of lost Ration Card)	30 Days			
4	Permission for New Ration Shop	180 Days after proclamation	Controller of Rationing/ Food Distribution Officer/ District Supply Officer	Divisional Commissioner / Collector	Secretary / Divisional Commissioner
5	Renewal of license of Ration Shop	60 Days	Deputy Controller of Rationing/ Food Distribution Officer/ District Supply Officer.	Controller of Rationing/ Collector	Divisional Commissioner

Schedule–contd.

(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)
6	Retail Kerosene sales license	90 Days	Food Distribution Officer / District Supply Officer	Collector	Divisional Commissioner
7	Renewal of Retail Kerosene sales license	60 Days	Food Distribution Officer/ District Supply Officer	Collector	Divisional Commissioner

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPAK KAPOOR,
Secretary to Government.

२५६

गुरुवार, ऑक्टोबर २९, २०१५/कार्तिक ७, शके १९३७

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑक्टोबर २०१५

आदेश

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८.

क्रमांक मुद्रांक. २०१३/५१३५/अनौ.सं.क्र.३/प्र.क्र.२०(१)/म-१.—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची महाराष्ट्र शासनाची खात्री पटत असल्याने खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशिप लि. (विशेष हेतू कंपनी) (ज्याचा उल्लेख यापुढे " उक्त विशेष हेतू कंपनी " असा करण्यात आला आहे) जिची स्थापना दिल्ली, मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोर या प्रकल्पाकरिता करण्यात आली आहे यांच्यामध्ये निष्पादित झालेल्या दुसऱ्या टप्प्यातील जमीन हस्तांतरणाच्या पहिल्या संलेखांवर आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क स्टेट शेअर ॲग्रीमेंट, स्टेट सपोर्ट ॲग्रीमेंट आणि शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.आयडीसी २०१३/ प्र.क्र.४५०/उद्योग १४, दिनांक १९ जानेवारी २०१५ मध्ये नमूद कोणत्याही अटींचा भंग झाल्यास उक्त विशेष हेतू कंपनी संपूर्ण मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र असेल या अटींस अधिन राहून माफ करीत आहे.

अनुसूची

अ. क्र.	संलेखाचा/हस्तांतरणाचा प्रकार	अधिनियमातील अनुसूची-१ मधील अनुच्छेद	क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)
१	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून उक्त विशेष हेतू कंपनीच्या औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशिप करिताच्या जमिनीच्या हस्तांतरण किंवा या अनुषंगाने उक्त विशेष हेतू कंपनीने केलेले भूसंपादन.	जमिनीचे भूसंपादन/ अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६)	जमिनीचे अंदाजीत क्षेत्र ४१० हेक्टर

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

श्यामसुंदर पाटील,
शासनाचे उप सचिव.

REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 23rd October 2015

Order

MAHARASHTRA STAMP ACT, 1958.

No.Mudrank. 2013/5135/UOR 3/C.R.20(1)/M-1.—In the exercise of the Powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra being satisfied that, it is necessary to do in the public interest hereby remits the stamp duty chargeable on the first instrument of transfer of land in the second phase specified in the Schedule appended hereto executed between Maharashtra Industrial Development Corporation and Aurangabad Industrial Township Ltd., Special Purpose Vehicle Company (hereinafter referred to as "the said Special Purpose Vehicle Company") established for the purpose of Delhi, Mumbai Industrial Corridor Project subject to the condition that in case of breach of any of the conditions specified in the State Share Agreement, the State Support Agreement and the Government Resolution, Industries, Energy and Labour Department No.IDC 2013/C.R.450/IND-14, dated 19th January, 2015 the said Special Purpose Vehicle Company shall be liable to pay the whole of the stamp duty and penalty, if any :

Schedule

No.	Type of Instrument/ Transfer	Type of Instrument under Articles Schedule I of the Act	Area
(1)	(2)	(3)	(4)
1	Transfer of land constituting the site for Aurangabad Industrial Township to the said Special Purpose Vehicle Company by Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) or in pursuance of land acquisition by the said Special Purpose Vehicle Company.	Acquiring land/ conveyance (Article 25), agreement of lease (Article 36)	Land admeasuring approximately 410 Hectare.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHYAMSUNDAR PATIL,
Deputy Secretary to Government.

२५७

गुरुवार, ऑक्टोबर २९, २०१५/कार्तिक ७, शके १९३७

सार्वजनिक बांधकाम विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ ऑक्टोबर २०१५

अधिसूचना

महाराष्ट्र मोटर वाहन कर अधिनियम.

क्रमांक खाक्षेस.२००८/प्र.क्र. ७९/एल.बी.२/रस्ते ९.—ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई आणि मेसर्स कल्याण-केटी टोल प्रा.लि., ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय विद्या दिप, १५/३, मनोरमागंज, इंदौर, मध्यप्रदेश ४५२ ००१, भारत येथे आहे, यांचेमध्ये " डी.बी.एफ.ओ.टी. " या तत्वावर नांदेड-नरसी रस्त्याचे (प्र.रा.मा.क्र.६) कि.मी. २६४/००० ते ३०७/००० या लांबीमध्ये चौपदरीकरण आणि नरसी-देगलूर रस्ता ते जिल्हा हद्द कि.मी. ३०७/००० ते ३४१/७०० या लांबीमध्ये दुपदरीकरण (यापुढे " सदर रस्ता " म्हणून संबोधण्यात येईल) या प्रकल्पाचा करारनामा दिनांक १६ जून २०११ रोजी सांक्षाकित करण्यात आलेला आहे ;

आणि, ज्याअर्थी सदर करारनाम्यानुसार सदर रस्त्याचे बांधकाम, वापर व देखभाल दुरुस्तीकरिता उद्योजकास २५ वर्षे इतका सवलत कालावधी, २ वर्षाचा बांधकाम कालावधीसह उद्योजकास दिनांक ३ नोव्हेंबर २०११ या प्रकल्प सुरू होण्याच्या दिनांकापासून मंजूर करण्यात आलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनातर्फे शासन अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. खाक्षेस-२००८/प्र.क्र.७९/एल.बी.२/रस्ते-९, दिनांक ३ जून २०१३ अन्वये सदर अधिसूचनेसोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ क्र. २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारांच्या मोटार वाहनांवर आणि रस्त्याचा वापर करणाऱ्या वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर दिनांक ४ जून २०१३ ते ३ सप्टेंबर २०१३ या कालावधीकरिता तसेच तद्नंतर दिनांक ३ सप्टेंबर २०१३, १५ ऑक्टोबर २०१३, १३ मे २०१४ आणि २८ ऑक्टोबर २०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासन अधिसूचनांद्वारे पथकर आकारण्यात आला आहे ;

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी धारणा आहे की, सदर रस्त्याचे बांधकाम, वापर आणि देखभाल दुरुस्ती ही जनतेला दिलेली विशेष सेवा आहे आणि त्यामुळे सदर रस्त्यावर कि. मी. २८७/४०० (बरबडा) येथे आणि कि.मी. ३३१/४०० येथे पथकर स्थानक उभारुन पथकर आकारणे व वसुली करणे महाराष्ट्र शासनास योग्य वाटत आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, (१९५८ चा ६५) यांच्या कलम-२० ची पोटकलमे (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याला समर्थनीय करणाऱ्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे घोषीत करते की, खाजगीकरण्याच्या माध्यमातून " डी.बी.एफ.ओ.टी. " या योजनेतून कल्याण-केटी टोल प्रायव्हेट लिमिटेड इंदौर यांनी स्वखर्चाने नांदेड जिल्ह्यातील नांदेड ते नरसी किलोमीटर २६४/०० ते ३०७/०० चे चौपदरीकरण व नरसी ते देगलूर राज्यसिमा किलोमीटर ३०७/०० ते ३४१/७०० बांधलेल्या रस्त्याचा वापर करणाऱ्या व खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या प्रकाराच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या, अनुयानांवर त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने दिनांक २९ ऑक्टोबर २०१५ पासून दिनांक २८ ऑक्टोबर २०१६ पर्यंतच्या कालावधीसाठी नांदेड-नरसी या रस्त्यावरील किलोमीटर २८७/४०० (बरबडा) व किलोमीटर ३३१/४०० येथे बांधण्यात आलेल्या पथकर वसुली स्थानकावर पथकर शुल्क वसुली करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

अनुसूची

अ. क्र.	वाहनाचा प्रकार	पथकराचे प्रती फेरीचे दर (रुपये)	
		२९/१०/२०१५ ते ३१/०३/२०१६	०१/०४/२०१६ ते २८/१०/२०१६
(१)	(२)	(३)	(४)
१	स्कुटर, मोटार सायकल, वाहन चालक वगळून ३ आसनी प्रवासी रिक्षा, रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर.	पथकर नाही	पथकर नाही
२	मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमुद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने.–		
	(अ)कार, जीप, टाटा सुमो, कमांडर, ट्रॅक्स, वाहन चालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा व इतर तत्सम (चालक वगळून १२ पर्यंत प्रवासी क्षमता असलेली) वाहने.	पथकर नाही	पथकर नाही
	(ब) मिनी बस किंवा तत्सम वाहने (चालक वगळून १२ पेक्षा जास्त पण २० प्रवासी क्षमते पर्यंत) आणि क्र. ३, ४ व ५ येथे नमूद केलेल्या वाहनांव्यतिरिक्त माल वाहतूक करणारी वाहने.	५५	६५
३	ट्रक (दोन आसाचे), बस.	११०	१३०
४	मोटार वाहन अधिनियम, १९८८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेले ट्रक वगळून ३ आसांची अवजड वाहने.	१८०	२१०
५	मोटार वाहन अधिनियम, १९८८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आणि अनुक्रमांक ३ व ४ मध्ये नमूद केलेली वाहने वगळून ३ पेक्षा अधिक आसांची वाहने. **उदा.** ट्रक-ट्रेलर, इत्यादी.	२७०	३२०

१. वरील दर्शविलेल्या पथकर नाक्यावर पथकर शुल्क गोळा करण्यात व पथकर शुल्काची संपूर्ण रक्कम ठेवून घेण्याचा हक्क मे. कल्याण-केटी टोल प्रायव्हेट लिमिटेड, इंदौर यांना प्रदान करण्यात आला आहे.

२. खालील वाहनांना पथकरातून सूट देण्यात येईल.

(१) भारताचे राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, राज्यांचे राज्यपाल व वाहनांना लाल दिवा अनुज्ञेय असलेल्या अति महत्त्वाच्या लोकप्रतिनिधींची वाहने.

(२) लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(३) महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सदस्य व लोकसभा व राज्यसभेचे माजी सदस्य,

(४) महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाच्या (एस टी) प्रवासी बसेस.

(५) स्कूल बसेस.

(६) केंद्र व राज्य शासनाची वाहने

(७) लष्कराच्या मालकीची वाहने.

(८) पोलीस विभागाची वाहने.

(९) टपाल आणि तार खात्याची वाहने.

(१०) रुग्णवाहिका.

(११) शववाहिका.

(१२) अग्निशमन दलाची वाहने.

३. पथकर दराचा फलक पथकर नाक्यावर सर्वांना दिसेल अशा पद्धतीने लावण्यात यावा. तसेच वाहन धारकांस प्रत्येक वेळी पथकर शुल्क वसुलीची संगणकीकृत पावती देण्यात यावी.

४. पथकर नाक्यावर सर्वांना दिसेल अशा पद्धतीने इलेक्ट्रॉनिक फलक लावण्यात यावा.

टीप.—पथकर शुल्काच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सूट देण्यात येईल.

(१) पथकराच्या ५० कुपन्सची पुस्तिका आगाऊ खरेदी करणाऱ्यास पुस्तिकेच्या किमतीमध्ये १० टक्के सवलत देण्यात येईल.

(२) पथकराच्या १०० कुपन्सची पुस्तिका आगाऊ खरेदी करणाऱ्यास पुस्तिकेच्या किमतीमध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

(३) वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी परतीच्या प्रवासाचे व दैनिक पासाचे दर हे त्या वाहनाच्या एकेरी प्रवास दराच्या अनुक्रमे दीडपट व अडीचपट राहतील. परतीच्या प्रवासाचा पास व दैनिक पास हा ज्या दिवशी पास काढला जाईल त्या दिवशीच्या रात्री १२-०० वाजेपर्यंत ग्राह्य राहील.

(४) मासिक पासाचे दर एकेरी प्रवास दराच्या ५० पट राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

रा. पां. निघोट,
शासनाचे उप सचिव.

PUBLIC WORKS DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 28th October 2015

NOTIFICATION

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

No.PSP.2008/CR-79/L.B.2/Road-9.—Whereas the Governor of Maharashtra through Secretary, Public Works Department, Mantralaya, Mumbai and M/s Kalyan Keti Toll Private Limited, having its registered office at "Vidya Deep, 15/3, Manoramaganj, Indore (M.P.)-452 001, India" have entered into Concession Agreement on the 16th June 2011, including all the subsequent agreements entered between them, for construction, operation and maintenance of four lanning of Nanded-Narsi Road (Major State Highway No.6) in kilometers 264/00 to 307/00 and two lanning of Narsi-Degloor Road upto the State Border, in kilometers 307/00 to 341/700 (hereinafter referred to as "the said road"), under the Design, Built, Fiance, Operate and Transfer (DBFOT) Scheme by M/s Kalyan-Keti Toll Private Limited, Indore ;

And whereas, as per the said agreement, the concession period of 25 years has been granted to the concessionaire to construct, operate and maintain the said road from the date of commencement of the work, *i.e.*, on the 3rd November 2011, which includes the period of construction of two years ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Government Notification, Public Works Department, No. PSP.2008/CR-79/L.B.2/Road-9, dated the 3rd June 2013, has levied the toll on the classes of motor vehicles specified in column (2) of the schedule appended thereto and on the tailors drawn by such motor vehicles, passing over the said road with effect from the 4th June 2013 to the 3rd September 2013 and thereafter by the Government Notifications, dated the 3rd September 2013, 15th October 2013, 13th May 2014 and 28th October 2014;

And whereas, the Government of Maharashtra is of the opinion that the construction, operation and maintenance of the said road is special service to the public and, therefore, considers it expedient to levy and collect the toll on the said road at the toll collection centres constructed at kilometer 287/400 (Barbada) and at kilometer 331/400;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*), (*1-D*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958) the Government of Maharashtra hereby declares that the toll shall be levied on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule appended hereto and on the tailors drawn by such motor vehicles, passing over the said road constructed under "Design, Built, Finance, Operate and Transfer (DBFOT) Scheme" by M/s Kalyan-Keti Toll Private Limited, Indore, at their expenses, at the toll collection centres constructed at kilometer 287/400 (Barbada) and at kilometer 331/400 on the said road for the period commencing from the 29th October 2015 and ending on 28th October 2016.

Schedule

Sr. No.	Particulars of Motor Vehicles	Rate of toll per trip (in rupees)	
		29-10-2015 to 31-3-2016	1-4-2016 to 28-10-2016
(1)	(2)	(3)	(4)
1	Scooter, Motor Cycle, Moped or any other two wheeler, Tractor and Tractor with unladen trolley, Auto-Rickshaw permitted to carry three passenger excluding driver.	NIL	NIL

Schedule-Contd.

(1)	(2)	(3)	(4)
2	Light motor vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988),—		
	(a) Car, Jeep such as Tata Sumo, Trax, Commander and any other similar vehicles having carriage capacity upto twelve passengers, excluding driver and Six Seater Rickshaw (Tum-Tum) ;	NIL	NIL
	(b) Mini Bus or any other similar vehicles having carriage capacity of more than twelve and upto twenty passengers excluding driver and goods carriage vehicles, except vehicles included in entries at serial numbers 3,4 and 5.	55	65
3	Trucks (two axle), Buses.	110	130
4	Heavy goods vehicles and heavy passenger motor vehicle defined in the Motor Vehicle Act, 1988(59 of 1988), such as three axle except vehicles covered by the entry at serial number 3 above.	180	210
5	Heavy goods vehicles and heavy passenger motor vehicles as defined in the Motor Vehicle Act, 1988 (59 of 1988), such as Truck-Trailer combination, multi-axle vehicles having more than three axles and except vehicles covered by the entry at serial numbers 3 and 4 above.	270	320

1. For the purpose of this notification, M/s. Kalyan-Keti Toll Private Limited, Indore is authorized to collect and retain the amount of toll at the toll collection centres constructed at kilometer 287/400 (Barbada) and at kilometer 331/400 on above mentioned road.

2. The following types of vehicles are exempted from payment of toll, namely :—

(*i*) VVIP vehicles carrying President of India, Vice-President of India, Governor of State, Public Representatives entitled for red lamp on their vehicles.

(*ii*) Vehicles carrying sitting Members of, Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

(*iii*) Vehicles carrying Ex-Member of Maharashtra Legislative Assembly, Maharashtra Legislative Council and Parliament.

(*iv*) Buses of the Maharashtra State Road Transport Corporation (ST).

(*v*) School Buses.

(*vi*) State and Central Government vehicles.

(*vii*) Defence vehicles.

(*viii*) Police Department vehicles.

(*ix*) Post and Telegraph Department vehicles.

(*x*) Ambulances.

(*xi*) Hearses.

(*xii*) Fire fighting vehicles.

3. The above mentioned rates shall be displayed on boards clearly visible to the people in the vicinity of the toll collection centre. A computerised toll receipt shall be passed on each and every occasion of recovery of toll.

4. Electronic Display Board shall be installed in vicinity of toll collection centre.

Note.—Concessions in rates of toll are as given below, namely :—

(*i*) 10 per cent. rebate will be given to the purchaser of booklet containing 50 coupons in advance.

(*ii*) 20 per cent. rebate will be given to the purchaser of a booklet containing 100 coupons in advance.

(*iii*) For frequently traveling vehicles, return and daily pass will be 1.5 times and 2.5 times of their respective one way travel rates. Return journey pass and daily pass will be valid upto 12.00 hours at midnight for the day of issuing the pass.

(*iv*) Rate of monthly pass will be 50 times of their respective one way travel rates.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. P. NIGHOT,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.